# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २२/०४/२०२२ (शुक्रवार)

---

## मौदा हद्दीत दरोडा करणारे ३ आरोपी पोलीसांच्या जाळ्यात
## एकुण १३,१०,०००/—रू चा माल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक १७.०४.२२ चे ०१.०० वा दरम्यान फिर्यादी नामे अक्षय वामनराव शिनपुरे वय २६ वर्ष रा रामेश्वरी नागपुर याने पोस्टे मौदा येथे रिपोर्ट दिला कि, तो ट्रक लोड करून अंबिकापुर येथे जात असता यातील आरोपीतांना त्याचा ट्रक थांबवुन आरोपी कॅबीनमध्ये आले व फिर्यादीचे तोंडावर दुपट्टा टाकुन फिर्यादीस मारहाण केली. व त्यांचेजवळील मोबाईल हीसकावुन त्याचा पासवर्ड विचारून "गाडी मे माल कितना है" यावरून फिर्यादीने डिक्की मध्ये २,०००/—रू व व टाटा कंपनीची सहा चक्का गाडी, किं १३,००,०००/—, मोबाईल फोन कि १०,०००/—रू व नगदी २०००/— रू असा एकुण १३,१२,०००/—रू चा माल अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र २३२/२२ कलम ३९४,३६३,३४ भादवि चा दाखल असुन तपासात होता.

सदर गुन्हयात समांतर तपासा दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी संशयीत ईसम नामे आरोपी नामे— **अनुज अनिल वर्मा वय २७ वर्ष रा पाटनकर चौक, नागपुर २. असलम अजर काजी वय १९ वर्ष रा. पाटनकर चौक, नागपुर ३. लखन पप्पु पांडे वय १९ वर्ष रा दिपक नगर नागपुर** यांना नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल विचारपूस केली असता त्याने वरील नमुद गुन्हा केल्याचे सांगीतले. त्यावरुन त्यास नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, टाटा कंपनीची सहा चक्का गाडी, किं १३,००,०००/—, मोबाईल फोन कि १०,०००/—रू व नगदी २०००/— रू असा एकुण १३,१२,०००/—रू चा माल जप्त करून पो.स्टे. मौदा येथील गुन्हा उघडकिस आणुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर प्रक्रीयेकरीता पो.स्टे.मौदा यांचे ताब्यात देण्यात आलेला असुन पुढील तपास पो.स्टे. मौदा करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा.,यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि अनिल राउत, पोहवा विनोद काळे, नाना राउत, पोहना प्रणय बनाफर, अमोल कुथे, चालक सफौ साहेबराव बहाळे, तसेच सतीश राठोड सायबर सेल नाग्रा यांनी पार पाडली

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)**

## खापा येथे जुगार अड्डयावर धाड ६ आरोपी अटकेत एकुण ३०,०१०/— रू चा माल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई...

दिनांक २१.०४.२२ रोजी उपविभागात प्रायवेट वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर खबर मिळाली कि मौजा चारगाव शेतशिवारातील चंद्रपाल बागडे यांचे शेतातील झोपडीमध्ये काही ईसम हे तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा खेळ खेळत आहे. सदर ठिकाणी रेड केली असता नगदी १४,३२०रू तसेच ०५ मोबाईल हॅडसेट व ईतर असा एकुण ३०,०१०/—रू चा माल केला. व आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे.

१. भारत तारांचद लांजेवार वय ३२ वर्ष रा चारगाव जि नागपुर
२. रहीम पी खॉ पठाण वय ३६ वर्ष रा बडेगाव सावनेर जि नागपुर
३. रमेश बापुराव तायवाडे वय ६० वर्ष रा रायवाडी जि नागपुर
४. अंकुश मंहदीलाल नरवरे वय २८ वर्ष रा बडेगाव जि नागपुर
५. मोसीम नासीर खान वय ३२ वर्ष रा हींगणा जि नागपुर
६. मोहन महादेव मुरड वय ४० वर्ष रा एज्युकेशन शाळेच्या जवळ नवीन वस्ती खापा

वरील सर्व आरोपीना ताब्यात घेवुन पोस्टे खापा येथे जुगार कायदयाखाली गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा.,यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोहवा राजु रेवतकर, पोना आशिष मुंगळे, किशोर वानखेडे यांनी पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)**

## घरफोडी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** — अंतर्गत मौजा बाजारगाव १५ किमी पुर्व. दिनांक १८/४/२२ चे १९/०० वा. ते २१/०४/२०२२ चे ०७/०० वा दरम्यान, यातील फिर्यादी यांच्या घराचे दरवाजाच्या लोखंडी सलाखने लॉक तोडुन घरातील बेडरूम मध्ये प्रवेश करून आलमारीचे ड्रॉवर मधुन नगदी ३९,०००/— रू व जुने वापरते सोन्याचे दागिने १७ ग्रॅम किंमत १०,२००/— रू असा एकुण ४९,२००/— रू चा माल कुणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रदीप मनोहरराव ढाले वय ५० वर्ष रा बाजारगाव जि नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे कोढाळी येथे आरोपीविरूध्द कलम ४५४,४५७,३८० भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पो.हवा. सुनिल बन्सोड मो क्र ९७६४०९०२०८ हे करीत आहेत.

## चोरी

**१.पोलीस स्टेशन खापा** – अंतर्गत मौजा गोसेवाडी शिवार २२ कीमी दक्षिण. यातील फिर्यादीचे शेतात राहणारा नौकर याने दिनांक १७/०४/२०२२ चे रात्री २३/०० वा दरम्यान शेतात असलेल्या मकानातुन फिर्यादीचा विडीओकॉन कंपनीची टी.व्ही, दोन मोटर पंप, गॅस सिलेंडर, एल.ए.डी लाईट, वायर बंडल २०० किलो, लोखंडी ॲंगल असा एकुण ३०,.०००/– रू चा माल ४०७ गाडी मध्ये भरून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे सफौ/ मुकुंदा लोन्दे पोस्टे खापा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपीविरूध्द कलम ३८१ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पो.हवा. सुनिल बन्सोड मो क्र ९७६४०९०२०८ हे करीत आहेत.

## चोरी

**२.पोलीस स्टेशन कुही** – अंतर्गत मौजा कुही ०१ किमी पश्चिम. दरम्यान, यातील टिप्पर क्र. एम.एच. ४० वाय ८३८५ यामध्ये ०५ ब्रास मुरूम एकुण किं. २०,२०,०००/– रू. चा माल भरून विनापरवाना मिळुन आल्याने यातील टिप्पर चालक आरोपी क्र. १) दिलीप जागोजी भांडे, रा. अंभोरा, ता. कुही, जि. नागपुर, याला विचारपुस केली असता, त्याने सदर टिप्पर ट्रक चालकाचे नाव २) निर्धन निबांर्ते, रा. मांढळ, ता. कुही, जि. नागपुर असल्याचे सांगितले. त्यानंतर जप्ती कारवाई करून सदचा टिप्पर ट्रक तहसिल कार्या. कुही च्या आवारात ठेवण्यात आला होता. यातील आरोपींनी संगणमत करून दिनांक २१/०४/२२ चे ०२.३० ते ०७.०० वा. दरम्यान तेथुन चोरी करून घेउन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी राजेश शंकराव बारापात्रे, वय ४६ वर्ष, रा. झिलपे यांच्या घरी किरायाने, कुही चौक, ता. कुही, जि. नागपुर, धंदा मंडळ अधिकारी तहसिल कार्या. कुही यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे आरोपीविरूध्द कलम ३७९,३४ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पो.स्टे. कुही हे करीत आहेत.

## मोपेड गाडी चोरी

**३.पोलीस स्टेशन खापा** – अंतर्गत मौजा माताखेडी खापा ०१ कि.मी उत्तर. यातील फिर्यादीने आपली ॲक्टीवा श्री जी गाडी क्र एमएच–४० एएस ०५१५ किं. २५,००० रू. ची नेहमी प्रमाणे दिनांक २०/०४/२०२२ चे दुपारी १३/०० वा वाजता बाजारातुन येवुन घरासमोर अंगनात ठेवली व घरी जेवण करून १६/०० वाजता घराबाहेर आले असता गाडी ठेवलेल्या जागेवर दिसली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज वसंतराव मदनकर वय ४२ वर्ष रा. माताखेडी खापा ता. सावनेर जि. नागपुर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास स.फौ विजय बारई ९८२२२८९५७२ हे करीत आहेत.

## विष प्राशन करून आत्महत्या

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा गजानन मंदीर मागे वार्ड क्र.१५ कळमेश्वर. यातील मृतक नामे– सौ. स्वाती प्रदिप पटेल वय ३२ वर्ष रा. गजानन मंदीर मागे वार्ड क्र.१५ कळमेश्वर. हीला तिचे पतीने हिला ३००/–रू मागीतले म्हणुन त्याच्यात वादविवाद होउन मृतक हिने घरी ठेवलेले कोणतेतरी कीटकनाशक औषध प्राशन केल्याने तिची प्रकृती खराब झाल्याने उपचार कामी कळमेश्वर मातोश्री हॉस्पीटल कळमेश्वर येथे नेले असता तिथे उपचार न करता रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपूर येथे भर्ती केले उपचार चालू असतांना दि. २०/०४/२२ चे ११/१० वा मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री मेश्राम मो क्र ९०७५२४५०५९ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**